महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा)
महाराष्ट्र शासनाची संस्था
Maharashtra Energy Development Agency (MEDA)
A Government of Maharashtra Institute

सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

MEDA महाऊर्जा

पीजीएन-१/धोरण-२०२०/ परिपत्रक/ २०२२-२३/१९१७ दि.२५ मे, २०२२

"आदेश"

**विषय: अपारंपरिक ऊर्जा निर्मिती धोरण - २०२० अंतर्गत जाहिर करणेत आलेल्या कार्यपध्दतीनुसार अपारंपरिक ऊर्जा निर्मिती प्रकल्प वेब पोर्टल नोंदणी शुल्क, अपारंपरिक ऊर्जा निर्मिती प्रकल्प नोंदणी शुल्क, प्रकल्पाच्या नावात / मालकीमध्ये बदल / कंपनीच्या पत्त्यातील बदल / प्रकल्पाची जागा बदल इ. करिता प्रक्रिया शुल्क आकारणेबाबत.**

**संदर्भ : १) अपारंपरिक ऊर्जा निर्मिती धोरण- २०२० शासन निर्णय क्र.अपाऊ-२०२०/ प्र.क्र.१३७/ऊर्जा-७, दि. ३१/१२/२०२० .**
**२) अपारंपरिक ऊर्जा निर्मिती धोरण - २०२० अंतर्गत कार्यपध्दती शासन निर्णय क्र. अपाऊ-२०२०/ प्र.क्र.१३७(अ)/ऊर्जा- ७, दि. ११/०५/२०२२.**

राज्याचे नवीन व नवीकरणीय (अपारंपरिक) ऊर्जा स्त्रोतांपासून वीज निर्मितीच्या प्रकल्पांसाठी पारेषण संलग्न / पारेषण विरहीत एकत्रित अपारंपरिक ऊर्जा निर्मिती धोरण - २०२० शासन निर्णय क्र. अपाऊ-२०२०/प्र.क्र.१३७/ऊर्जा-७/ दि. ३१.१२.२०२० अन्वये जाहीर करण्यात आले आहे. सदरच्या अपारंपरिक ऊर्जा निर्मिती धोरणांतर्गत पोरषण संलग्न व पोरषण विरहित अपारंपरिक ऊर्जा प्रकल्प आस्थापित /कार्यान्वित करण्याबाबतची कार्यपध्दती शासन निर्णय क्र. अपाऊ- २०२०/ प्र.क्र.१३७(अ)/ऊर्जा- ७ दि. ११/०५/२०२२ अन्वये निश्चित करण्यात आली आहे.

या कार्यपध्दतीअंतर्गत आस्थापित करावयाच्या पारेषण संलग्न अपारंपरिक ऊर्जा प्रकल्पांबाबत पारेषण जोडणी ते सदर प्रकल्प कार्यान्वित होई पर्यंतची सर्व प्रक्रिया महाऊर्जाव्दारे विकसित केलेल्या ऑनलाईन पोर्टलव्दारे राबविण्यात येणार आहे.

दि. ३१/१२/२०२० च्या धोरणांतर्गत सर्व अपारंपरिक ऊर्जा प्रकल्पांची तदर्थ नोंदणी करण्यासाठी महाऊर्जाच्या वेब पोर्टलचा वापर करण्यात येईल. याबाबत महाऊर्जाकडून विहित शुल्क आकारण्यात येईल असे नमूद आहे.

यास अनुसरुन महाऊर्जा स्तरावर वेब पोर्टल नोंदणी, अपारंपरिक ऊर्जा प्रकल्प नोंदणी तसेच कंपनीच्या नावात / प्रकल्पाच्या नावात / मालकीमध्ये बदल / कंपनीच्या पत्यातील बदल /प्रकल्पाच्या जागा बदल / मालकी हक्क हस्तांतरण नाहरकत पत्र इ. बाबी वर कार्यवाही करण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे शुल्क निश्चित करणेत येत आहे.

**शुल्काचा तपशील खालील प्रमाणे.**

| अ.क्र. | तपशील | शुल्क (रु.) |
|---|---|---|
| १ | विकासक / प्रकल्प धारक नोंदणी | ५०००/- + १८% जीएसटी |
| २ | अपारंपरिक ऊर्जा प्रकल्पांची वेब पोर्टलवर प्राथमिक नोंदणी | ५०००/- प्रति प्रकल्प + १८% जीएसटी |
| ३ | अपारंपरिक ऊर्जा प्रकल्प नोंदणी | ५०,०००/- प्रति मे.वॅ. + १८% जीएसटी |
| ४ | प्रकल्प कंपनीच्या नावात / प्रकल्पाच्या मालकीमध्ये बदल / कंपनीच्या पत्यातील बदल /प्रकल्पाची जागा बदल प्रक्रिया शुल्क | २५,०००/- प्रति प्रकल्प + १८% जीएसटी |
| ५ | प्रकल्पाचे मालकी हक्क हस्तांतरण नाहरकत पत्र | २५,०००/- प्रति प्रकल्प + १८% जीएसटी |

उपरोक्त नमूद शुल्कामध्ये वेळोवेळी होणारे बदल लागू राहतील.
तरी वरील बाबींच्या अनुषंगाने शुल्काचा भरणा ऑन लाईन पध्दतीने करणेत यावा.

(रविंद्र जगताप, भा.प्र.से.)
महासंचालक, महाऊर्जा

प्रत -
१. खाजगी सचिव
मा. मंत्री महोदय (ऊर्जा) न.व.न.ऊ मंत्रालय, मुंबई - ४०००३२.



Y:\KSD\Methodology under policy 2020\Methodology\Fees order Methodology ...

२. मा. प्रधान सचिव (ऊर्जा)
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
३. सर्व अपारंपरिक ऊर्जा प्रकल्प विकासक / प्रकल्प धारक
४. सर्व विभाग प्रमुख, महाऊर्जा मुख्यालय, पुणे.
५. उपसंचालक (लेखा), महाऊर्जा, पुणे.